**सं.फौ.ख.क्र.५४३/२०२३**
**प्रकाश काळे –वि– गौतम संकलेचा वगैरे २**
**निशाणी क्र. १८ खाली.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ प्रकाश पूंडलिक काळे यांचा आरोपीचे विधिज्ञ श्री. ए. टी. देवरे यांच्यातर्फे उर्वरित उलटतपास शपथेवर सुरु.**

६. सदरचा वादातीत चेक आरोपी क्र. १ व आरोपी क्र. २ च्या संयुक्त खात्याचा असल्यामुळे मी प्रस्तुतकामी आ.क्र. २ ला देखील पक्षकार केलेले आहे. आ.क्र. १ व २ चे जॉईंट खाते असल्यामुळे पैसे केवळ एकाच्या सहीने देता येणार नाहीत अशी क्युरी बँकेने मला काढली नव्हती. आ.क्र. १ चा प्लॉट खरेदी–विक्रीचा व्यवसाय आहे हे दाखवण्यासाठी माझ्याकडे लेखी पुरावा नाही. आ.क्र. १ सोबत माझा जो देवाण–घेवाणचा व्यवहार झाला त्यावेळी इतर कोणीही उपस्थित नव्हते.

७. हे म्हणणे खरे नाही की, एखादा मोठा व्यवहार करायचा झाल्यास तो उसनवार पावती किंवा अशा लेखी दस्ताअन्वये केला जातो. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नातेवाईकांनाच मोठ्या रकमा हातउसने दिल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की, एकाच दिवशी बँकेमध्ये १० लाखाचा व्यवहार होत नाही. माझ्या पेन्शनचे पैसे खात्यामध्ये जमा होते. तेच पैसे मी आरोपींना दिले होते. मी दि.३१.०५.२०२१ रोजी सेवानिवृत्त झालो. त्यावेळी मला र.रु. ३२ लाखच्या दरम्यान मिळाले होते. मला फंडाची आलेली रक्कम रुपये पूर्ण ३२ लाख मी कशा प्रकारे खर्च केले किंवा त्याबाबत काय व्यवहार केले हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांचा एक व्यवहार झाला. त्यानंतर जसे पैसे येत गेले तसे त्यांनी ते त्यांच्या खात्यात

जमा केले. माझे फंडाचे र.रु. ३२ लाख माझ्या बँकेच्या खात्यामध्ये जमा केले. त्या बँकेच्या खात्याचा उतारा मी दाखल करायला तयार आहे. मी आयकर भरतो. त्याचेही कागदपत्र दाखल करण्यास मी तयार आहे.

८. मैत्रीच्या संबंधातून या व्यवहारापूर्वी आ.क्र. १ सोबत मी कोणताही हातउसनेचा व्यवहार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा छोटा किराणा दुकानाचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचा उदरनिर्वाह त्याच्या दुकानाच्या व्यवसायातून चालतो. हे म्हणणे खरे नाही की, आ.क्र. १ व माझ्यामध्ये व्यवहार झाला त्यादिवशी माझ्या मुलाने वादातीत चेक भरला. हे म्हणणे खरे आहे की, मी सिक्युरिटीपोटी चेक घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, नंतर तो चेक माझ्या मुलाने भरला. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आ.क्र. १ च्या सांगण्यानुसार माझ्या मुलाने चेकवर फक्त माझे नाव लिहिले व त्यावर आरोपीने सही केली. मला आरोपींनी चेक कोणत्या तारखेला दिला हे मला आठवत नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, चेकवरील रक्कम देखील माझ्या मुलाने लिहिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडून सिक्युरिटीपोटी घेतलेल्या चेकवर सही देखील माझ्या मुलाने केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती सही आरोपीने केलेली नाही. माझा मुलगा प्राध्यापक आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाला माझ्या व आरोपींच्या व्यवहाराबद्दल काहीही माहिती नव्हती. आरोपीकडून सदर व्यवहाराबाबत दस्तऐवज करुन घेण्याचा सल्ला मला माझ्या मुलाने दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून सिक्युरिटीपोटी चेक घेण्याचा सल्ला मला माझ्या मुलाने दिला होता.

१०. मला आरोपींनी उत्तरी नोटीस दिली होती. मी किंवा माझ्या पत्नीने आरोपींविरुद्ध पो.स्टेशनला तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्याकडे सिक्युरिटीपोटी दिलेला कोरा चेक मागितल्यावर आमच्यामध्ये वाद झाला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी पत्नी आरोपींना म्हणाली की, तुम्हाला चेक परत करणार नाही, वाद घालू नका नाहीतर मी विष घेईल. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला म्हणाले की, माझा तुमच्यासोबत कोणताही लेखी व्यवहार झालेला नाही, तुम्ही माझा कोरा चेक परत द्या. तेव्हा मी आरोपींसोबत वाद केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला उत्तरी नोटीस देऊन सुद्धा मी त्याला न जुमानता आरोपींनी मला सिक्युरिटीपोटी दिलेला चेक बँकेत वटण्यासाठी जमा केला.

११. मी जो एक व्यवहार केलेला आहे त्याचे कागदपत्र दाखल करायला तयार आहे. तो व्यवहार किती रुपयांचा होता हे मला सांगता येणार नाही.

**आरोपींच्या वकीलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.02.10 16:59:44 +0530

**दिनांक – १०/०२/२०२६**

**ठिकाण –चांदवड.**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**